### पान १ वरून

## मलनि:सारण वाहिन्यांसाठी ४३१.३९ कोटी रूपये खर्च

जाग आलेल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आता सिव्हरेज मास्टर प्लॅन तयार केला आहे. यामध्ये २०१७ पर्यंत शहरातील सर्व जुन्या वाहिन्या काढून टाकल्या जाणार आहेत. त्या जागी नवीन मोठ्या व्यासाच्या वाहिन्या पुढील वीस ते तीस वर्षांच्या लोकसंख्या वाढीचा दर लक्षात घेता टाकले जात आहेत. त्यासाठी शहरात साधारणत: १८० किलोमिटर लांबीच्या या मलवाहिन्या टाकाळे जात आहेत . त्यासाठी बाराशे कोटी रूपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे.

## शहराच्या मध्यवर्ती भागात ५३ हजार ४९३ गणपतींचे विसर्जन

क्षेत्रिय कार्यालयाच्या भागांचा समावेश होतो. यामध्ये मुख्यत्वे कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय व भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या भाग हा शहराचा मध्यवर्ती भाग आहे. या ठिकाणी शहरातील सर्व मुख्य रस्त्यांचा म्हणजेच लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, शंकरशेठ रस्ता या प्रमुख रस्त्यांचा समावेश होतो. तसेच शहरातील मानाचे पाच गणपती म्हणजेच कसबा गणपती, गुरुजी तालीम , तुळशीबाग , तांबडी जोगेश्वरी, केसरीवाडा तसेच भाविकांच्या दृष्टीने मुख्य आकर्षण असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती या गणपतींचा समावेश होतो.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय व भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयामार्फत नदिकिनारी एकूण पाच हौद, तसेच परिमंडळ पाच कार्यालयाच्या हद्दीत एकूण ८१ ठिकाणी घरगुती गणपतींचे विसर्जनासाठी हौदांची व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जन व्यवस्थेअंतर्गत विविध हौदांचे ठिकाणी व सर्व मुख्य रस्त्यांवर व गणेश मंडळांचे ठिकाणी दोन शिफ्टमध्ये स्वच्छता सेवकांची नेमणुक करण्यात आली होती. व ठिकठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी मोबाईल टॉयलेट्स उभारणेत आले होते. व आवश्यक त्या ठिकाणी ॲम्ब्युलन्स, आय.सी.यु व डॉक्टर्स यांची नेमणुक करण्यात आले होती. गणेशोत्सव सुरु होणेपुर्वी मिरवणूकीस अडथळा ठरणा-या व धोकादायक फांद्यांची वृक्ष छाटणी आवश्यकतेनुसार करण्यात आली. तसेच पोलिस विभागामार्फत मागणी केल्यानुसार व आवश्यकतेनुसार पोलिस मदत केंद्र, वॉच टॉवर व अन्य सोई-सुविधांची उभारणी व व्यवस्था करण्यात आली होती.

या सर्व मिरवणुक मार्गांवर नियंत्रणाकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत अलका चौक, साहित्य परिषद चौक व माती गणपती या ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारणेत आले होते. नियंत्रण कक्षात म.न.पा. मार्फत तीन शिफ्ट मध्ये अधिकारी व कर्मचारी यांची व्यवस्था करण्यात आली होती. सुरक्षिततेच्या दृष्टीने ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले होते. तसेच आवश्यकतेनुसार विद्युत विभागामार्फत विद्युत रोषणाई करण्यात आली होती. अलका चौक येथे दुपारी दोन वाजता मानाचा पहिला गणपती कसबा गणपती यांचे आगमन होवून तदनंतर गणेश मंडळांचे विसर्जनास सुरुवात झाली. सदरची मिरवणुक अत्यंत सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडली. या दरम्यान केळकर रस्ता येथून एकूण १११ गणपती मंडळांचे विसर्जन झाले, लक्ष्मी रस्त्यावरुन एकूण २५१ गणपती मंडळांचे विसर्जन झाले व टिळक रस्ता येथून एकूण १८८ गणपती मंडळांचे विसर्जन झाले असे एकूण ५५० गणपती मंडळांचे विसर्जन झाले.

## पुणे महापालिकेच्या हद्दीत १२५ आयुष्मान आरोग्य मंदिर

उपायुक्त मालमता व्यवस्थापन विभाग, उपायुक्त परिमंडळ क्र १ ते ५, अधिक्षक अभियंता भवन रचना विभाग, मुख्य अभियंता विद्युत विभाग पुणे मनपा, परिमंडळ वैद्यकीय अधिकारी क्र १ ते ५, इ. अधिकारी उपस्थित होते. राज्य सरकारने पुणे महानगरपालिकेसाठी १२५ आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करण्यास मंजुरी दिलेली आहे. आयुष्मान मंदिरांमध्ये नागरिकांना व रुग्णांना आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये प्रामुख्याने खालील १४ सेवासुविधा पुरविल्या गर्भधारणा आणि बाळंतपणाची काळजी घेणे. नवजात आणि अर्भक आरोग्य सेवा, बालपण आणि किशोरवयीन आरोग्य सेवा, कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक सेवा आणि इतर पुनरुत्पादक आरोग्य सेवा, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांसह संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन. सामान्य संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन आणि तीव्र सामान्य आजार आणि किरकोळ आजारांसाठी बाह्यरुग्ण देखभाल, असंसर्गजन्य रोगांचे स्क्रीनिंग, प्रतिबंध, नियंत्रण आणि व्यवस्थापन, सामान्य नेत्ररोग आणि ईएनटी समस्यांसाठी काळजी, मुलभूत मौखिक आरोग्य सेवा, वृद्ध आणि उपशामक आरोग्य सेवा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मानसिक आरोग्याच्या आजारांचे स्क्रीनिंग आणि मुलभूत व्यवस्थापन, योगा शिबिरे, दूरध्वनी सल्ला आदी सुविधा मिळणार आहेत. सद्यस्थितीमध्ये एकून ८४ ठिकाणी आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित झालेले आहेत, त्यापैकी १३ ठिकाणी स्थानिक नागरिकांनी विरोध केला होता व २ ठिकाणी नागरिकांनी नव्याने उभारलेल्या आयुष्मान आरोग्य मंदिराची तोडफोड केलेली होती व तेथील सर्व सामान चोरीला गेलेले होते, याबाबत गुन्हा ही नोंदविण्यात आला होता.

## राज्यात चार नवीन कारागृह; येरवडा, हिंगोली, भुसावळ आणि गोंदिया

भविष्याचा विचार करता तीन हजार क्षमतेचे नवीन कारागृह देखील अपुरे पडणार आहे.त्यामुळे येरवडा खुल्या कारागृहाच्या ७५ एकर जागेवर चार हजार क्षमतेचे दोन नवीन कारागृह उभारण्याची मागणी केली होती. तसेच नवीन कारागृह सोबतच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवासस्थाने बांधकामे प्रस्तावित केली होती.राज्य सरकारने येरवडा मध्यवर्ती कारागृह साठी पहिल्या टप्प्यात ४०६४ कैदी क्षमतेचे एक कारागृह आणि ६३३ अधिकारी, कर्मचारी निवासस्थानकरीता १६३१ कोटी ची प्रशासकीय मान्यता दिली आहे.याशिवाय हिंगोली,भुसावळ आणि गोंदिया जिल्ह्यात प्रत्येकी ५०० कैद्यांचे नवीन कारागृहाला प्रत्येकी १८० कोटी रुपयांची मान्यता मिळाली असून सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे.

## पत्रकारांच्या सुरक्षेसाठी पुरेशी काळजी घेऊ : पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार

सदस्य संख्या मर्यादित राहावी यासाठी ढोल ताशा पथक संघटना आणि गणेश मंडळे यांना देखील सूचना दिल्या जातील. महिला पत्रकाराचा विनयभंग झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाई देखील तात्काळ करू असे आश्वासन शिष्टमंडळास त्यांनी दिले. पत्रकारांना वार्तांकन करण्यासाठी जे पोलीस पासेस दिलेले असतात त्यानुसार, नियमित वार्तांकन करण्याची मुभा देखील असते याची कल्पना संबंधितांना दिली जाईल असे त्यांनी सांगितले. भविष्यात योग्य प्रकारे वार्तांकन पत्रकारांना करता यावे यादृष्टीने कार्यक्रमांपूर्वीच योग्य प्रकारे चर्चा विनिमय करून आवश्यक त्या उपाययोजना राबवल्या जातील असे देखील त्यांनी सांगितले.

# येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दोन दिवसांत दोन रुग्ण पळून गेल्याचा प्रकार



( सौजन्य चॅट जिपीटी प्राधिनिधीक चित्र )

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दोन दिवसांत दोन रुग्ण पळून गेल्याचा प्रकार घडला.एकीकडे रुग्णालयातील रुग्ण वॉर्डात गळफास घेऊन आत्महत्या करत असताना रुग्ण पळून जात आहे. त्यामुळे रुग्णांच्या सुरक्षेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करून नेमलेले खाजगी सुरक्षारक्षक यांच्या कार्यपद्धतीतवर शंका निर्माण होते.

मनोरुग्णालयातील वॉर्ड क्रमांक दोन मध्ये उपचार घेऊन बरे झालेला एक रुग्ण मंगळवारी सायंकाळी पळून गेला. वॉर्डाच्या शेजारील झाडावर चढुन रुग्ण सीमा भिंत

> **रुग्णायातील वॉर्ड क्रमांक दोन मधून मंगळवारी आणि बुधवारी सायंकाळी दोन रुग्ण पळून गेल्याचा प्रकार घडला आहे.एक रुग्ण त्याच्या गावी बीड ला पोहचला आहे,तर दुसऱ्या रुग्णाला काही तासातच आळंदी रस्त्यावर पकडण्यात आले.रुग्ण पळून गेल्या प्रकरणी जबाबदार कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावणार आहे.रुग्णालयाच्या आवारात लवकर सीसीटीव्ही बसविण्यासाठी विभागाकडे पाठपुरावा करत आहे.**
> **– डॉ. श्रीनिवास कोलोड,प्रभारी वैद्यकीय अधीक्षक , येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय**

ओलांडून पळाला.काही वेळाने रुग्णांची मोजणी करताना एक रुग्ण पळून गेल्याचे उघडकीस आले. त्यांनतर बुधवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास महिला वार्डातील एका कैदी रुग्णाने अंगावरील कपड्याची दोरी करून खिडकीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

सकाळी महिला रुग्णाने आत्महत्या केल्यानंतर सायंकाळी वॉर्ड क्रमांक दोन मधून आणखीन एका रुग्ण रुग्णालयातून पळून जाण्यात यशस्वी झाला. रुग्ण पळून गेल्याचे समजताच सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांनी रुग्णांचा शोध सुरू केला. काही काळानंतर आळंदी रस्त्यावर पळून गेलेल्या रुग्णाला पकडण्यात आले.

मनोरुग्णालयात मागील पंधरा दिवसांत दोन कैदी रुग्णांनी उपचार घेणाऱ्या वार्डातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. यादरम्यान दोन दिवसांत दोन रुग्ण एकाच वॉर्डातून पळून गेल्याच्या घटना घडलेत. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांची सुरक्षा रामभरोसे झाली असल्याचे समोर येत आहे.

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प अहवाल १५ ऑक्टोबरपर्यंत शासनाकडे सादर करावा

## केंद्राकडे निधी मागणीचे पत्र पाठवावे ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील पाणीटंचाई दूर करण्यासोबतच शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच आर्थिक नियोजनासाठी केंद्र सरकारकडे निधी मागणीसंदर्भात पत्र पाठवून पाठपुरावा केला जाईल आणि राज्य सरकारकडून



आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे सादरीकरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या वेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजय गवळी, अधीक्षक अभियंता महादेव कदम, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ अमरावतीचे अधीक्षक अभियंता योगेश दाभाडे, कार्यकारी अभियंता जितेंद्र तुरखेडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, प्रकल्पाची तपासणी




## व्हिजन डॉक्युमेंट २०४७ हे राज्याच्या धोरणात्मक निर्णयांची मार्गदर्शक तत्वे

**मुंबई । प्रतिनिधी**

गीता, बायबल, कुराण आणि विकासाचे संविधान प्रमाणे व्हिजन डॉक्युमेंट २०४७ ही भविष्यासाठीची आपली मार्गदर्शक तत्वे आहेत. या व्हिजन नुसार भविष्यातील राज्याची धोरणे तयार करावीत असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे विकसित महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट २०४७ बाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत यावेळी बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. पाणी, वीज, शिक्षण, सामाजिक कल्याण, उद्योग आणि सेवा, तंत्रज्ञान, अर्थकारण हे आजच्या सादरीकरणाचे क्षेत्र होते.

सादरीकरणाबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सादरीकरण अतिशय चांगले झाले असून त्यात डीप थिंकिंग झाले आहे. आपण योग्य मार्गावर आहोत. पुढील वीस-पंचवीस वर्षांसाठीचा आराखडा तयार होतो आहे. व्हिजन म्हणजे दिशा; त्यामुळे आपले गोल आणि त्यांची दिशा निश्चित असणे आवश्यक आहे. केवळ कागदोपत्री सादरीकरण न राहता ते प्रत्यक्षात साध्य व्हावे, यासाठी आपली संपूर्ण क्षमता लावली पाहिजे. आपल्या धोरणांची आखणी ह्या व्हिजननुसार झाली पाहिजे. पुढील पाच वर्ष आपण सातत्याने या व्हिजनवर काम केले, तर २०४७ मध्ये विकसित महाराष्ट्राचे स्वप्न आपण नक्की पूर्ण करू, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले .

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सहकार क्षेत्र राज्यासाठी महत्वाचे आहे. त्यावर जास्त लक्ष द्यावे. उत्तम प्रशासनासाठी माहिती तंत्रज्ञान याचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर द्यावा. भारत नेट रिंग लवकरात लवकर विकसित करावी.

सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत सहकार्य द्यावे. देशातील सर्वोत्तम व्हिजन डॉक्युमेंट म्हणून हा आराखडा उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. विविध शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठे यांची गुणवत्ता वाढीवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

# गणेश भक्तांचे मोबाईल चोरी करणाऱ्या दोन जणांना अटक

**पान १ वरून**

३०३ (२) अन्वये दाखल झाले. फरासखाना पोलीस स्टेशन येथील प्रभारी प्रशांत भस्मे यांनी तपास पथकातील अधिकारी वैभव गायकवाड व अरविंद शिंदे तसेच तपास पथकातील पोलीस अमंलदार यांना दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध सुरु केला. तपास अधिकारी महेबुब मोकाशी व तपापथकातील पोलीस अमंलदार तानाजी नांगरे, नितीन तेलंगे, मनिषा पुकाळे, नितीन जाधव, गजानन सोनुने, महेश पवार व चेतन होळकर यांचेसह अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना तपास पथकातील पोलीस अमंलदार तानाजी नांगरे व गजानन सोनुने यांचे गोपनीय माहितीद्वारे शिताफीने पासोड्या विठोबा मंदीराजवळ पुणे येथुन तपास पथकातील पोलीस मदतीने आरोपी नामे अलीम मुस्ताक शेख (वय २६ वर्षे, रा. गल्ली नं. ६ अमिन किराणा दुकानाजवळ, मालेगांव जिल्हा नाशिक) , अत्तर अहमद एजाज अहमद (वय २५ वर्षे, रा. मुस्लीम नगर, बी-गल्ली नं. ५, सर्व्हे नं. १५९ प्लॉट नं. १६ बडे कब्रस्थान जवळ, मालेगाव जिल्हा नाशिक) यांना ताब्यात घेवुन, त्यांना दाखल गुन्हयात अटक केले. त्यांचे ताब्यातुन एकुण १३ नग वेग-वेगळ्या कंपनीचे महागडे फोन जप्त करुन, असा सर्व मिळुन एक लाख ७८ हजार - रु किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात तपास पथकाला यश आले आहे. दाखल गुन्हयाचा तपास सहा. पोलीस उप-निरीक्षक महेबुब मोकाशी, हे करीत आहे.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग). राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त (परि-१ पुणे) कृषिकेश रावले, सहा. पो. आयुक्त (फरासखाना विभाग) अनुजा देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे, पो. नि. (गुन्हे) उत्तम नामवाडे, पो. नि. (गुन्हे) श्री. अजित जाधव, स.पो.नि. वैभव गायकवाड, अरविंद शिंदे, पोलीस उप-निरीक्षक, सहा. पोलीस- उप निरीक्षक महेबुब मोकाशी, कृष्णा निढाळकर तसेच पोलीस अमंलदार तानाजी नांगरे, नितीन तेलंगे, नितीनजाधव, गजानन सोनुने, महेश पवार, चेतन होळकर, महेश राठोड, प्रविण पासलकर, विशाल शिंदे, प्रशांत पालांडे, सुमित खुट्टे, शशीकांत ननावरे, वशिम शेख, म.पो. अंमलदार मनिषा पुकाळे यांच्या पथकाने केलेली आहे.

# कॅन्सर टाळण्यास उपयुक्त रानभाज्या व औषधीवनस्पती लागवडी गरजेच्या : मोरे

## मविप्र आंतरमहाविद्यालयीन रानभाज्या कृषीप्रदर्शन व पाककला स्पर्धा संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

रासायनिक फवारणी केलेल्या भाज्यांच्या सेवनामुळे घरोघरी कॅन्सरचे संकट पोहोचत आहे, ज्यामुळे वेदनादायी मृत्यू आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहेत. यामुळे आरोग्यावरील खर्चाचा बोजाही वाढत आहे. मात्र, रासायनमुक्त रानभाज्यांचे नियमित सेवन करून कॅन्सर रोखणे शक्य आहे. आधुनिक शेतीच्या नादात आपण रानभाज्यांचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. परंतु, परदेशी अभ्यासक आपल्या रानभाज्यांचा अभ्यास करून त्यांच्या देशात गावरान बियाण्यांचे अमूल्य ठेवे घेऊन जात आहेत. रानभाज्यांच्या औषधी गुणधर्मांमुळे त्यांना राजभाज्या आणि औषधी वनस्पती म्हणून ओळखले जाते. शाळा आणि महाविद्यालयांमधून रानभाज्यांच्या लागवडीसाठी मोहिमा राबवणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी रानभाज्यांच्या आरोग्यदायी गुणधर्मांचे संशोधन करून प्रॉडक्ट आणि प्रोसेस पेटंट मिळवावेत, असे आवाहन मराठा विद्या प्रसारक (मविप्र) समाज संस्थेचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे यांनी केले.

मविप्रचे पिंपळगाव बसवंत येथील कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आयोजित मविप्र आंतरमहाविद्यालयीन रानभाज्या कृषीप्रदर्शन व पाककला स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी, कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते.

प्रमुख पाहुणे विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर यांनीही रानभाज्यांचे सांस्कृतिक आणि आरोग्यदायी महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, रानभाज्या आपल्या परंपरेचा अविभाज्य भाग आहेत. बदलत्या जीवनशैलीत



**मविप्र क. का वाघ महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित आंतरमहाविद्यालयीन रानभाज्या कृषीप्रदर्शन व पाककला स्पर्धेचे उद्घाटन करताना मविप्र उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे, ॲड. प्रवीण ठाकरे, ॲड. सुरेश गायकवाड, प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, प्रोफे. (डॉ.) सुलभा लालसरे, डॉ. सचिन जाधव आदी.**

त्यांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. या भाज्या चविष्ट तर आहेच, पण त्या आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी जपण्याची जबाबदारी आपली आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव यांनी रानभाज्यांच्या संवर्धनाचे महत्त्व आणि कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. महाविदयालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव यांनी यावेळी विद्य्यार्थ्यांना प्रोसाहन देत त्यांच्या धडपडीचे व कौशल्याचे कौतुक केले. यावेळी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे, ॲड. प्रवीण ठाकरे, ॲड. सुरेश गायकवाड, प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. भगवान कडलग, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रोफे. (डॉ.) सुलभा लालसरे, डॉ. सचिन जाधव आदी उपस्थित होते.

**रानभाज्या कृषीप्रदर्शन व पाककला स्पर्धेत झुंबड**

महाविद्यालयात आयोजित रानभाज्या कृषीप्रदर्शन व पाककला स्पर्धा पाहण्यासाठी झुंबड उठली होती. जाईचा मोहर, कुर्डू, तांदुळजा, तोंडळी, पाथरी, अंबाडी, हादगा, अळू, बाजरीची पुडी, रताळे, पानवडी, बांबू कोंब लोणचे, टाकळा भजी, केळी फुल भाजी, बेल फळाचा मुरंबा, वरकन्द, विडा पानाचे मोदक यांसारख्या नाविण्यपूर्ण पाककृतींचा आस्वाद उपस्थितांनी घेत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. खेडगाव कला आणि वाणिज्य महाविद्यालय आणि श्री स्वामी शटकोपाचार्याजी महाराज कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सायखेडा येथील विद्यार्थ्यांनी सहभागासह बाजी मारली. रानभाज्या प्रदर्शनात ४२ पाककृती आणि १० विद्यार्थ्यांनी आपले रानभाज्यांवरील संशोधन सादर केले. प्रा. यशवंत शिरसाट, डॉ. दीपा कुचेकर, प्रा. सतिश हरळ यांनी पाककृती परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. राहुल गायखे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. मेघा रायते यांनी आभार मानले. प्रा. योगेश गिडगे, प्रा. निकिता जाधव, प्रा. माधुरी कारे, प्रा. शिवानी गवळी, विजय मत्सागर, प्रकाश ठाकरे, प्रवीण पवार आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.